# जलप्रलय

प्रलयासम ही स्थिती जाहली, जलमय झाली धरणी ।
नजर पोचते, तिथवर दिसते, चहुकडे पाणीच पाणी ॥धृ॥
जीवनदायिनी ही अमुची माता ।
कशी कोपली न कळे आता ॥
फुत्कारत, सळसळत चालली जशी काळनागिनी ।
नजर पोचते, तिथवर दिसते . . . . . . ॥१॥
काडी काडी जोडून घरटे हे बांधले ।
क्षणार्धात कसे होत्याचे नव्हते झाले ॥
बघत राहिलो, हतबल झालो, अती दीनवाणी ।
नजर पोचते, तिथवर दिसते . . . . . . ॥२॥
मुले माणसे, गुरे वासरे, झाली वाताहत ।
कोण, कुणीकडे, कोठे गेले काही ना कळत ॥
जो तो शोधितो आधार काडीचा, धडपडे केविलवाणी ।
नजर पोचते, तिथवर दिसते . . . . . . ॥३॥
देवा आधी केलीस जीवाची काहिली ।
टाका थेंबासाठी देवा, किती करुणा भाकली ॥
रौद्र रुपाने तुझिया या, भयकंपीत झाली अवनी ।
नजर पोचते, तिथवर दिसते . . . . . . ॥४॥
तूच वाचवी, संकटातूनी, समर्थ सद्गुरुनाथा ।
तुजविण आता, मार्ग दाविण्या नसे कुणी त्राता ॥
कृपा करी, क्षमा करी, ठाव देई तव चरणी ।
नजर पोचते, तिथवर दिसते, चहुकडे पाणीच पाणी . . ॥५॥

सौ. शोभा पांडे
गुरुगणेशनगर, कोथरुड पुणे